# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

(आस्थापना व प्रशासन विभाग)

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email:- gug.registrar@gmail.com दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com

जा.क्र. गो.वि./आस्था./४०६९/२०२६ दि. १२/११/२०२६

## // अधिसूचना //

**विषय :- गोंडवाना विद्यापीठाच्या चौदाव्या दीक्षांत समारंभाच्या वेळेत बदल झाल्याबाबत.**

**संदर्भ:-** १. विद्यापीठाची दीक्षांत समारंभाची अधिसूचना जा.क्र. आस्था./3144, दि. 19/09/2026.

२. विद्यापीठाची अधिसूचना जा.क्र. आस्था./3454, दि. 06/10/2026.

३. विद्यापीठाची अधिसूचना जा.क्र. आस्था./3576/2026, दि. 27/10/2026.

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, संदर्भ क्र. ३ अन्वये गोंडवाना विद्यापीठाचा चौदावा दीक्षांत समारंभ रविवार, दि. 15 नोव्हेंबर, 2026 रोजी सकाळी 11.30 वाजता 'गोंडवाना विद्यापीठाचे नवीन सांस्कृतिक सभागृह' येथे आयोजित करण्यात आला असल्याचे सूचित करण्यात आले होते.

परंतु, काही अपरिहार्य कारणास्तव सदर दीक्षांत समारंभाच्या वेळेमध्ये बदल करण्यात आला असून, आता हा चौदावा दीक्षांत समारंभ रविवार, दि. 15 नोव्हेंबर, 2026 रोजी **दुपारी 01.30 वाजता** 'गोंडवाना विद्यापीठाचे नवीन सांस्कृतिक सभागृह' येथे संपन्न होणार आहे. समारंभाचे स्थळ आणि तारखेमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

या दीक्षांत समारंभाचे अध्यक्षस्थान मा. श्री. जिष्णू देव वर्मा, महामहिम राज्यपाल, महाराष्ट्र राज्य तथा मा. कुलपती, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली अथवा त्यांचे अनुपस्थितीमध्ये डॉ. प्रशान्त बोकारे, मा. कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली हे भूषविणार असून प्रमुख पाहुणे म्हणून श्री. देवेंद्र फडणवीस, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, श्री. ज्युएल ओराम, मा. केंद्रीय आदिवासी मंत्री, भारत सरकार, श्री. चंद्रकांत (दादा) पाटील, मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्यए श्री. चंद्रशेखर बावणकुळे, मा. महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य, डॉ. अशोक उईके, मा. आदिवासी विकास मंत्री, महाराष्ट्र राज्य, ॲड. आशीष जयस्वाल, मा. सह-पालकमंत्री, गडचिरोली जिल्हा, श्री. बी. प्रभाकरण, मा. व्यवस्थापक संचालक, लायड्स मेटल्स व एनर्जी लिमी. यांची उपस्थिती लाभणार आहे. तसेच या समारंभात गोंडवाना विद्यापीठाचे मा. कुलगुरु, डॉ. प्रशान्त बोकारे व मा. प्र-कुलगुरु, डॉ. श्रीराम कावळे यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

सदर समारंभामध्ये मा. अध्यक्ष, प्रमुख पाहुणे, विशेष अतिथी, अधिसभा, व्यवस्थापन परिषद, विद्यापरिषद यांचे सन्माननीय सदस्य आणि विद्यापीठातील विविध प्राधिकरणाचे/मंडळाचे/समित्यांचे सदस्य यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. या समारंभात विशेष गुणवत्ता प्राप्त, प्रावीण्य प्राप्त विद्यार्थी व विद्यार्थीनींना सुवर्णपदक, आचार्य पदवी व पदवी प्रदान करण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे संस्थाचालक, प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी, विद्यार्थी तसेच विद्यापीठातील शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी तसेच विद्यार्थी यांनी दीक्षांत समारंभाकरीता रविवार, दि. 15 नोव्हेंबर, 2026 रोजी **दुपारी 01.30 वाजता** 'गोंडवाना विद्यापीठाचे नवीन सांस्कृतिक सभागृह' येथे उपस्थित राहावे, ही नम्र विनंती.

*मा. कुलगुरु महोदयांच्या मान्यतेने*

(डॉ. अनिल हिरेखण)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:-**

१. मा. राज्यपालांचे सचिव, लोकभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, विभाग मुंबई.
३. मा. संचालक, उच्च व तंत्र शिक्षण, विभाग पुणे.
४. मा. सहसंचालक, उच्च व तंत्र शिक्षण, नागपुर विभाग, नागपूर,
५. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली.
६. मा. कुलगुरु यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
७. मा. प्र-कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
८. सर्व प्राधिकरणांचे सन्माननीय सदस्य, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
९. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा कार्यवाहीस्तव अग्रेषित.
१०. मा. सर्व शैक्षणिक तसेच प्रशासकीय विभाग प्रमुख युनिट प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी सदरहू अधिसूचना कृपया, आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे.
११. सिस्टीम अनॅलिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सूचित करण्यात येते की, सदर अधिसूचना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.
१२. आस्थापना व प्रशासन विभाग (नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

Scanned with OKEN Scanner